**<u>ठळक बातम्या</u>**

- इंडिया मेरीटाईम वीक २०२५ साठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मुंबई दौऱ्यावर
- नीती आयोगाच्या औद्योगिक उत्पादन क्षेत्रातल्या रोडमॅपचं पुण्यात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन
- राज्य परिवहन महामंडळाला यंदाच्या दिवाळीत ३०१ कोटी रुपयांचं उत्पन्न
- मोंथा चक्रीवादळाच्या प्रभावामुळे मराठवाड्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस, पुढचे दोन दिवस मुसळधार पावसाचा इशारा

**आणि**

- भारत-ऑस्ट्रेलिया टी-२० क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात, नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा ऑस्ट्रेलियाचा निर्णय

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. सागरी क्षेत्रात काम करणाऱ्या जगभरातल्या प्रतिनिधींच्या परिषदेला ते संबोधित करणार आहेत. भारत समुद्री सप्ताह २०२५ या नौवहन परिषदेत होणाऱ्या जागतिक सागरी मुख्य कार्यकारी अधिकारी मंचाचं अध्यक्षपदही ते भूषवतील. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हिसी-अंकिता**

*(पाच दिवसांच्या या परिषदेचं उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते २७ तारखेला झालं. केंद्रीय बंदरविकास, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनीही या परिषदेला संबोधित केलं. परिषदेच्या पहिल्या दिवशी राज्याच्या बंदर विभागानं सागरी व्यापार क्षेत्रात ५६ हजार कोटी रुपयांचे १५ सामंजस्य करार केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वार्ताहरांशी बोलताना दिली.*

*इंडिया मेरीटाइम वीकच्या दुसऱ्या दिवशी, म्हणजे काल, सोनोवाल यांच्या हस्ते समुद्री वारसा दिनाचं उद्घाटन, तसंच लोथल इथल्या प्रस्तावित राष्ट्रीय समुद्री नौकानयन वारसा संकुलाच्या बोधचिन्हाचं अनावरण आणि संशोधन अहवालाचं प्रकाशन झालं, तसंच विविध देशांच्या सत्रांमध्ये त्यांनी आपले विचार मांडले.*

*परिषदेत ८५हून अधिक देशांतले एक लाखाहून अधिक प्रतिनिधी, तसंच साडेतीनशेहून अधिक आंतरराष्ट्रीय वक्ते सहभागी होणार आहेत. परिषदेच्या पार्श्वभूमीवर विविध देशांसोबत द्विपक्षीय बैठका, सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या इत्यादी कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.)*

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज अंबाला इथल्या हवाईदल तळावरुन राफेल लढाऊ विमानातून उड्डाण केलं. त्यांनी सुमारे २५ मिनिटं प्रवास केला. यापूर्वी एप्रिल २०२३मध्ये आसाममधल्या तेजपूर हवाई दल तळावरून सुखोई ३० एमकेआय या लढाऊ विमानातूनही राष्ट्रपती मुर्मू यांनी उड्डाण केलं होतं.

**<><><><><>**

औद्योगिक उत्पादन क्षेत्रात महाराष्ट्राला मोठी संधी असून देश याबाबतीत जगाचं नेतृत्व करेल, तेव्हा महाराष्ट्र देशात आघाडीवर असेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केलं. औद्योगिक उत्पादन क्षेत्रात भारताला जगात आघाडीवर नेण्याच्या दृष्टीनं नीती आयोगानं तयार केलेल्या रोडमॅपचं प्रकाशन आज पुण्यात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. वर्ष २०३५ पर्यंत जीडीपीतलं या क्षेत्राचं योगदान २५ टक्क्यांवर नेणं, १० कोटीपेक्षा जास्त रोजगार निर्माण करणं आणि जगातल्या तीन सर्वोच्च औद्योगिक उत्पादक देशांमध्ये भारताला स्थान मिळवून देणं, हे या रोडमॅपचं उद्दिष्ट आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम कम्प्युटिंग आणि सेमीकंडक्टर या तीन क्षेत्रांतल्या प्रगतीचा मोठा प्रभाव सर्वच क्षेत्रांवर पडला असून याचा फायदा कसा करून घेता येईल, याचा विचार नीती आयोगाच्या रोडमॅपमध्ये केला असल्याचं फडनवीस म्हणाले. अत्याधुनिक कारखानदारी क्षेत्रातली जगातली पहिली प्रशिक्षण संस्था महाराष्ट्रात उभारण्याचा नीती आयोगाचा मानस असल्याची माहिती त्यांनी कार्यक्रमानंतर वार्ताहरांशी बोलताना दिली.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, तसंच नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही.आर. सुब्रह्मण्यम उपस्थित होते.

**<><><><><>**

शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत सरकार पहिल्या दिवसापासून सकारात्मक आहे, अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी आज मांडली. शेतकरी नेते बच्चू कडू यांनी इतके विविध प्रश्न मांडलेले आहेत, की फक्त आंदोलनाच्या माध्यमातून ते सोडवता येणार नाहीत, त्यावर चर्चा करून रोडमॅप तयार करावा लागेल, त्यामुळे त्यांना चर्चेचं निमंत्रण दिलं आहे, असं त्यांनी सांगितलं. आंदोलनात झालेल्या गर्दीमुळे सामान्य नागरिकांना त्रास झाला, त्यामुळे त्यांनी असे प्रकार टाळावेत, रेल रोकोसारखी आंदोलनं करू नये, चर्चेसाठी यावं, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. अनेकदा अशा आंदोलनांमध्ये अनेक घातक प्रवृत्ती शिरतात, त्यापासून सावध राहायला हवं, असा इशारा त्यांनी दिला.

शेतकऱ्यांची कर्जमाफी, अतिवृष्टीग्रस्तांना तात्काळ मदत या आणि इतर मागण्यांसाठी शेतकरी संघटनांनी कालपासून आंदोलन सुरू केलं आहे. वर्धा इथून हे आंदोलक काल नागपूरमधे पोहोचले. सरकारने आंदोलक नेत्यांना काल चर्चेसाठी आमंत्रित केलं होतं, मात्र कर्जमाफी झाल्याशिवाय कुठलीही चर्चा होणार नाही अशी भूमिका शेतकरी नेत्यांनी घेत आंदोलन सुरू ठेवलं. प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी आंदोलनासाठी पुढाकार घेतला असून यात किसान सभा, स्वाभिमानी शेतकरी संघटना, राष्ट्रीय समाज पक्ष सहभागी झाले आहेत.

**<><><><><>**

सोलापूर महापालिकेतल्या २६ प्रभागांतल्या १०२ जागांसाठी आरक्षण सोडत ११ नोव्हेंबरला काढण्यात येणार आहे. या संबंधीचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने काढले असून, महापालिकांच्या आरक्षण सोडतीचं वेळापत्रक देखील आयोगाकडून जाहीर करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

राज्य परिवहन महामंडळाला यंदाच्या दिवाळीत ३०१ कोटी रुपयांचं उत्पन्न मिळालं आहे. गेल्या वर्षीच्या दिवाळी हंगामातल्या उत्पन्नापेक्षा ते ३७ कोटी रुपयांनी जास्त आहे. दिवाळीच्या शेवटच्या दिवशी म्हणजे २७ ऑक्टोबरला ३९ कोटी ७५ लाख रुपये उत्पन्न मिळालं असून यंदाचं आतापर्यंतचं हे सर्वाधिक उत्पन्न आहे. सर्वाधिक उत्पन्न पुणे विभागाला मिळालं असून त्याखालोखाल जळगाव आणि नाशिक विभागाचा क्रमांक लागतो.

**<><><><><>**

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेच्या लाभासाठी लाभार्थ्यांनी ई-केवायसी प्रक्रिया १८ नोव्हेंबर पर्यंत पूर्ण करावी, असं आवाहन महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केलं आहे. मुंबई इथं मंत्रालयात काल आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. ई-केवायसी प्रक्रिया सुलभ करण्यात आली असून, लाभार्थी महिला स्वत:च्या मोबाईलवरूनही ही प्रक्रिया कमी वेळात पूर्ण करू शकतात, असं त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

राज्यातला ऊस गाळप हंगाम अधिकृतपणे सुरू होण्यापूर्वीच विनापरवाना गाळपाला सुरुवात केल्याबद्दल पाच साखर कारखान्यांना साखर आयुक्तालयाने नोटिसा बजावल्या आहेत.

सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील या कारखान्यांना सुनावणीसाठी बोलावलं आहे.

**<><><><><>**

म्हाडा पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळातर्फे पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पी एम आर डी ए सह सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातल्या विविध गृहनिर्माण योजनेतल्या ४ हजार १८६ सदनिकांच्या विक्रीसाठी आयोजित

संगणकीय सोडतीसाठी अर्ज सादर करण्यासाठी २० नोव्हेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अर्जदारांच्या सोयीसाठी याबाबतची सविस्तर माहिती म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे.

**<><><><><>**

अल कायदा या दहशतवादी संघटनेशी संबंधित संशयित दहशतवादी जुबैर हंगरगेकर याच्या पुण्यातल्या कोंढवा भागातल्या घरातून दहशतवाद विरोधी पथकानं महत्त्वाचे पुरावे जप्त केले आहेत. तपासादरम्यान एटीएसला त्याच्या घरातून अल कायदा इन्स्पायर मासिकं तसंच एके-४७ रायफल चालवण्याची आणि बॉम्ब बनवण्याची माहिती असलेली अनेक छायाचित्रं मिळाली आहेत. या कारवाईनंतर एटीएसनं जुबैर हंगरगेकरच्या एका सहकाऱ्याला पुणे स्थानक परिसरातून आज ताब्यात घेतलं असून त्याची सखोल चौकशी सुरू आहे.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यातल्या नाशिक–छत्रपती संभाजीनगर महामार्गावर एरंडगाव रायते गावाजवळ आज पहाटे रस्ता अपघातात तिघांचा मृत्यू झाला असून ४ जण जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. गुजरात मधून सात जण कारने शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी निघाले होते. कार चालकाचा ताबा सुटून कार रस्ता दुभाजकावर उलटली.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या यांच्यातल्या टी-२० मालिकेतल्या पहिल्या सामन्यात आज पावसाचा व्यत्यय आला. ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. भारताच्या ५ षटकात १ बाद ४३ धावा झाल्या असताना पावसामुळे खेळ थांबवावा लागला. त्यामुळे हा सामना प्रत्येकी १८

षटकांचा होणार आहे. थोड्या वेळापूर्वी खेळ पुन्हा सुरु झाला असून शेवटची बातमी हाती अली तेव्हा भारताच्या ६ षटकात १ बाद ५३ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेलं मोंथा चक्रीवादळ काल आंध्रप्रदेशच्या किनाऱ्यावर धडकलं. मात्र आता त्याचा जोर कमी झाला असून ते वायव्येच्या दिशेने पुढे सरकत आहे असं हवामान विभागानं सांगितलं. मात्र वादळाच्या प्रभावामुळे मराठवाड्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. छत्रपती संभाजीनगर, लातूर, नांदेड, परभणी , हिंगोली, बीड, जालना आणि धाराशिव जिल्ह्यांमधे पावसाने हजेरी लावली.  यामुळे नदी, नाले, ओढ्यांना पूर आला असून विविध प्रकल्पांमधून पाण्याचा विसर्ग सुरू आहे. नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. काढून ठेवलेल्या सोयाबीन पिकांना पावसाचा मोठा फटका बसला आहे.

अरबी समुद्रावर तयार झालेला कमी दाबाचा पट्टा गेले ३ तास मुंबईपासून ४१० किलोमीटर अंतरावर स्थिर राहिला असून तो येत्या ३६ तासात ईशान्येकडे सरकण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**